**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचार विरोधी समित्यांचे अध्ययन

## संदर्भ :- महाराष्ट्र राज्य

**डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
सहयोगी प्राध्यापक,
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नवीन नांदेड.
*Corresponding Author-* **डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
**DOI- 10.5281/zenodo.14870706**

**गोषवारा :-**

महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत असून, येथे मालकी हक्काची खाजगी कंपन्या, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, लघु व मध्यम उद्योग तसेच असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कामगार कार्यरत आहेत. या संशोधनाचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार विरोधी समित्यांच्या (Internal Complaints Committee – ICC) कार्यपद्धतीचे विश्लेषण करणे आहे.

**प्रस्तावना :-**

POSH कायद्यांतर्गत महाराष्ट्रातील सर्व कंपन्यांना ICC स्थापन करणे बंधनकारक आहे १० किंवा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक संस्थेमध्ये लैंगिक अत्याचार विरोधी समिती असावी, ICC ची रचनेमध्ये एक अध्यक्ष (महिला असावी), दोन कर्मचारी सदस्य, आणि एक स्वतंत्र तज्ज्ञ सदस्य असतात तक्रारींची चौकशी ९० दिवसांत पूर्ण होणे आवश्यक आहे सर्व कंपन्यांनी वार्षिक अहवाल सरकारकडे सादर करणे बंधनकारक आहे

**उद्देश :-**

1. महाराष्ट्रातील POSH कायद्याची (Prevention of Sexual Harassment at Workplace Act, 2013) अंमलबजावणीत समित्यांची भूमिका समजून घेणे.
2. सरकारी अहवाल, औद्योगिक क्षेत्रातील CSR अहवाल आणि मानवाधिकार संस्थांच्या निष्कर्षांचा अभ्यास करणे.
3. संशोधित आकडेवारी आणि धोरणात्मक दस्तऐवजांच्या आधारे समित्यांची परिनामकारक्ता अभ्यासने.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये द्वितीय स्त्रोतांचा वापर करून लेखन करण्यात आले आहे ज्यामध्ये महाराष्ट्र शासनाचे महिला व बालविकास विभागाचे अहवाल, POSH कायदा 2013 आणि त्याच्या अंमलबजावणीवरील सरकारी आकडेवारी, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) आणि औद्योगिक क्षेत्रातील CSR अहवाल, राष्ट्रीय महिला आयोग (NCW) आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग (MSCW) च्या वार्षिक अहवालातील माहिती, मानवाधिकार संस्था, NGOs आणि विविध उद्योग संघटनांचे संशोधन लेख इ. चा वापर करण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्रातील कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार विरोधी समित्या (POSH ICC) व कार्यपद्धती :-**

महाराष्ट्रातील POSH कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विविध समित्या कार्यरत आहेत. या समित्या दोन स्तरांवर कार्य करतात एक अंतर्गत तक्रार समित्या (Internal Complaints Committees - ICC) – जी कंपन्यांच्या अंतर्गत स्थापन केलेली समिती व दुसरी स्थानिक तक्रार समित्या (Local Complaints Committees - LCC) – ज्या ठिकाणी ICC नाही अशा संस्थांसाठी जिल्हा प्रशासनाद्वारे स्थापन केल्या जाणाऱ्या समित्या आहेत ज्यामध्ये महाराष्ट्रातील महत्त्वाच्या लैंगिक अत्याचार विरोधी समित्या (ICC आणि LCC)

- **आंतर्गत तक्रार समित्या (ICC) – कंपन्यांतील समित्या :-**

POSH कायद्यानुसर महाराष्ट्रातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये ICC स्थापन केल्या आहेत. ह्या काही महत्त्वाच्या कंपन्या आणि संस्थांतील ICC यांची यादी आहे ज्यामध्ये माहिती-तंत्रज्ञान (IT) आणि BFSI क्षेत्रातील कंपन्या कंपन्या TCS (Tata Consultancy Services) – ICC, Infosys Ltd. – ICC, Wipro Technologies – ICC, Capgemini India – ICC, HDFC Bank – ICC, ICICI Bank – ICC व उत्पादन (Manufacturing) आणि ऑटोमोबाईल क्षेत्रातील कंपन्या ह्या Tata Motors Ltd., पुणे – ICC, Mahindra & Mahindra Ltd., नाशिक – ICC, Bajaj Auto Ltd., औरंगाबाद – ICC, L&T Engineering, मुंबई – ICC व फार्मा आणि आरोग्यसेवा क्षेत्रातील कंपन्या ह्या Cipla Ltd., मुंबई – ICC, Serum Institute of India, पुणे – ICC, Hindustan Unilever Ltd., मुंबई – ICC आणि प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन क्षेत्रातील कंपन्या ह्या Zee Entertainment Enterprises, मुंबई – ICC, Times Group (Bennett, Coleman & Co.), मुंबई – ICC,

- **स्थानिक तक्रार समित्या (LCC) – जिल्हा प्रशासनाच्या समित्या :-**

POSH कायद्यानुसार ICC नसलेल्या छोट्या कंपन्या, असंघटित क्षेत्रातील कामगार, तसेच स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांसाठी LCC स्थापन करणे बंधनकारक आहे महाराष्ट्रातील प्रमुख स्थानिक तक्रार समित्या (LCC) यांची जिल्हानिहाय समित्या आहेत त्या म्हणजे मुंबई शहर स्थानिक तक्रार समिती ज्यामध्ये अध्यक्ष हे मुंबई जिल्हाधिकारी असतात व मुंबई उपनगर स्थानिक तक्रार समिती ज्यामध्ये अध्यक्ष हा जिल्हा समाज कल्याण अधिकारी असतो त्याचबरोबर पुणे जिल्हा स्थानिक तक्रार समिती असते ज्याचा अध्यक्ष हा पुणे जिल्हाधिकारी असतो नाशिक जिल्हा स्थानिक तक्रार समितीचा अध्यक्ष हा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी असतो औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) LCC ज्याचा अध्यक्ष हा जिल्हा समन्वय अधिकारी असतो नागपूर जिल्हा स्थानिक तक्रार समितीचा अध्यक्ष हा नागपूर जिल्हाधिकारी असतो ठाणे जिल्हा स्थानिक तक्रार समितीचा अध्यक्ष हा ठाणे महानगरपालिका महिला व बालकल्याण अधिकारी असतो

**स्थानिक तक्रार समित्याच्या जबाबदाऱ्या (LCC) :**

ICC नसलेल्या कंपन्यांमधील तक्रारींची दखल घेणे, लैंगिक अत्याचाराच्या तक्रारींची चौकशी करून अहवाल सादर करणे, महिला कामगार आणि लघु उद्योजक महिलांना POSH कायद्याची माहिती देणे, समित्यांच्या कार्यपद्धती बद्दल असे असे स्पष्ट करता येईल ज्यामध्ये ICC च्या कार्यक्षमतेचा आढावा घेताना त्यामध्ये FICCI च्या महाराष्ट्र शाखेच्या अहवालानुसार, मोठ्या कंपन्यांमध्ये ICC प्रभावीपणे कार्यरत आहेत तर CSR अहवालानुसार, MNC कंपन्या वार्षिक POSH प्रशिक्षण आयोजित करतात व LCC च्या कार्यक्षमतेत काही समस्याही जसे Maharashtra State Women's Commission च्या अहवालानुसार, LCC ची जागरूकता अजूनही कमी आहे तर RTI अंतर्गत मिळालेल्या माहितीप्रमाणे, 2022 मध्ये केवळ 50% LCC नी POSH तक्रारींवर निर्णय घेतला आहे त्यामुळे यतामध्ये काही सुधारणा आणि उपाययोजना करणे आवश्यक आहे जसे ICC च्या अहवालांचे स्वतंत्र लेखापरीक्षण अनिवार्य करणे, LCC च्या कामकाजावर अधिक कठोर नियंत्रण ठेवणे, ग्रामीण भागातील LCC अधिक सक्रिय करण्यासाठी NGOs सोबत भागीदारी करणे,

**महाराष्ट्रातील समित्यांची परीणामकारकता :-**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अहवालानुसार (2023), मुंबई आणि पुणे येथील 80% IT कंपन्यांमध्ये POSH कायद्याचे पालन प्रभावीपणे होत आहे, Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) च्या नुसार, मोठ्या उत्पादन क्षेत्रातील (manufacturing sector) 70% कंपन्यांनी ICC स्थापन केली आहे CSR अहवालांनुसार, काही कंपन्यांनी POSH कायद्याबद्दल कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या आकडेवारीनुसार, ग्रामीण भागातील 60% कंपन्यांमध्ये ICC अस्तित्वात नाही FICCI च्या महाराष्ट्र शाखेच्या अहवालानुसार, असंघटित क्षेत्रातील (विशेषतः कृषी, बांधकाम आणि सेवा क्षेत्रात) POSH कायद्याची अंमलबजावणी अत्यंत कमी आहे, RTI अंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार, 2022-23 मध्ये

महाराष्ट्रातील केवळ 40% कंपन्यांनी ICC चा वार्षिक अहवाल सादर केला होत POSH कायद्याच्या अंमलबजावणीतील महाराष्ट्रातील आव्हाने आहेत त्यामध्ये औद्योगिक आणि असंघटित क्षेत्रातील तफावत आहे ज्यामध्ये बृहन्मुंबई आणि पुणे येथे मोठ्या कंपन्यांमध्ये ICC कार्यरत असल्या तरी लहान आणि मध्यम उद्योगांमध्ये अंमलबजावणी अपुरी असल्याचे आढळते.

असंघटित क्षेत्रात (गृहसेवा, बांधकाम, शेतमजुरी) POSH कायद्याची प्रभावी अंमलबजावणी नाही त्याचबरोबर जागरूकतेचा अभाव आहे Maharashtra Women Entrepreneurs Association च्या अहवालानुसार, केवळ 35% महिला कर्मचारी POSH कायद्याबद्दल पूर्णपणे जागरूक आहेत महिला कर्मचारी तक्रार देण्यास घाबरतात, कारण त्यांना नोकरी गमावण्याची भीती असते व चौकशी प्रक्रियेतील विलंब ज्यामध्ये महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे, 2022 मध्ये ICC समोर आलेल्या 60% तक्रारी 6 महिन्यांहून अधिक काळ प्रलंबित होत्या ICC ला अधिक प्रभावी करण्यासाठी Maharashtra State Industrial Cluster (MSIC) आणि HR संघटनांनी ICC ची स्वतंत्र लेखापरीक्षण (audit) प्रणाली विकसित करणे गरजेचे आहे आणि सरकारी व खासगी भागीदारीतून (PPP Model) ICC सक्षमीकरणासाठी उपक्रम राबवावेत Maharashtra Chamber of Commerce (MCC) च्या माध्यमातून सर्व औद्योगिक कंपन्यांना POSH कायदा प्रशिक्षण अनिवार्य करावे, ग्रामीण भागात NGOs मार्फत POSH कायद्याची माहिती पोहोचवावी आणि चौकशी प्रक्रिया सुधारण्यासाठी ICC ला तक्रारींचे ९० दिवसांत निराकरण करण्यासाठी सक्षम करणे गरजेचे आहे ICC च्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र POSH निरीक्षण मंडळ स्थापन व्हायला हवे म्हणजे समित्यांची परिणामकारक्ता दिसून येईल.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रातील मोठ्या औद्योगिक कंपन्यांमध्ये POSH कायद्याची अंमलबजावणी समाधानकारक असली तरी लघु-मध्यम उद्योग, असंघटित क्षेत्र आणि ग्रामीण भागात याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे Maharashtra State Women’s Commission आणि उद्योग संघटनांनी ICC च्या कामकाजावर वार्षिक अहवाल प्रसिद्ध करावेत त्याचबरोबर सर्व लघु-मध्यम उद्योगांसाठी POSH प्रशिक्षण अनिवार्य करावे तक्रारींच्या गुप्ततेचे आणि पीडितांच्या संरक्षणाचे अधिक कठोर उपाययोजना व्हायला हवी.

महाराष्ट्रातील मोठ्या कंपन्यांमध्ये ICC प्रभावी आहे, मात्र LCC ची कार्यक्षमता वाढवण्याची गरज आहे. POSH कायद्याची अंमलबजावणी 100% होण्यासाठी ICC आणि LCC या दोन्ही यंत्रणांना अधिक बळकट करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

1. POSH Act, 2013 – भारत सरकार.
2. Maharashtra State Women’s Commission Annual Report, 2023.
3. Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) CSR Report, 2022.
4. National Commission for Women (NCW) Report on POSH Implementation, 2023.
5. FICCI Maharashtra Branch Report on Workplace Harassment, 2023.